Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# ललिता गादगे यांच्या कथा साहित्याचा अभ्यास

**डॉ.सुधाकर भिकाजी जाधव**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा जि. जालना

ललिता गादगे यांची 'आस' नावाची पहिली कथा 'केसरी' मासिकात छापून आली आणि तिला अंबाजोगाईचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. ललिता गादणे यांचे लिखाण विपुल प्रमाणात नसेल पण दखल घेण्याजोगे नक्कीच आहे. त्यानिमित्ताने लेखिकेचा आत्मशोध लक्षात घेण्यासारखा आहे. त्यांच्या साहित्यातून घडणारा आत्मशोध हा एकेरी स्तरावरील आणि एकपदरी स्वरुपाचा नसून त्याला दुहेरी परिमाण प्राप्त झाली आहेत. अनेक पदरी संदर्भानी त्यांचे कथलियन महाराष्हालील मराठवाडा या संदर्भाना उजागर करत आाहे. त्यांच्या मराठवाड्यातील कथाले बनाची समकालिनता समजावून घेत, ग्रामीण लेखनाचीही समकालिनता समजावून घेत, लालेता बाईचे निराळेपण लसाल लसाल घेतले पाहिजे.

ललिताबाईचे पूर्ण नाव ललिता नागोराव गादगे आहे. त्यांचा जन्म एक जून एकोणिशे चौपन्नाला कर्नाटक प्रातांत, बीदर जिल्हयात रक्शाळ गावी झाला मराठा कुटुंबातून मराठी भाषेचे सैस्कार झाले. आजूबाजूचे वातावरण सीमा भागातील असल्याने कानडी भाषेचाही परिचय त्यांना आहे.

" संस्काराने ज्याची सिद्धी झालेली असते ती संस्कृती म्हणून संस्कार आणि संस्कृतीचा दोहोंचा अविभाज्य संबंध आहे" असे प्रा. नरेंद्र मारवाडे संस्कार आणि संस्कृतीबाबत म्हणतात. सीमाभागात राहूनही मराठी भाषेचे संस्कार झाल्याने ललिताबाईनी मराठी कथा वाङ्मयात ग्रामीण कथेत मोलाचे योगदान दिले आहे. दहावी झाल्यानंतर लग्न झाल, पण लग्नानंतरही त्यांनी शिक्षण चालू ठेवलं. बारावी, बी.ए. एम.ए इंग्रजी, बीएड झाल्या. अहमदपूर याठिकाणी ज्यु. लेक्चरर म्हणून नोकरी करून २०१२ ला सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीनंतरही त्यांची

वाङ्मयाची सेवा चालूच आहे. 2014 ला माजलगाव येथे भरलेल्या मराठवाडा लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड झाली.

ललितबाईनी कविता प्रथम लिहीली. कवितेत त्या स्वतःच व्यक्त झाल्या. नंतर मात्र आपण परिघ वाढवला पाहिजे असा विचार करून डोळसपणे आजूबाजूच वातावरण न्याहाळलं. यातून त्यांना त्याचं कथाबीज सापडलं गेले, आवडत राहील, त्यांच चितंन वाढलं चर्चा करण, वाचन या सर्वांमधून त्यांना त्यांच्या आजूबाजूलाच कथेची पात्र सापडली. त्यांच्या परिसरातील अनुभवातील, व्यवसायातील पात्रांच त्यांनी सूक्ष्मपणे निरीक्षण केलं आणि कथाविश्व उभं केल.

कर्नाटकातील बीदर आणि महाराष्ट्रातील लातूर या भागातील वातावरणाचे संस्कार त्यांच्यावर झाले आहेत. हे दोन्ही जिल्हे एकमेकांना लागून आहेत. दोन्ही सिमा-रेषांना ललिताबाईनी आपल्या साहित्याद्वारे सांधून घेतले. कथा लेखिका म्हणून त्यातही ग्रामीण मराठवाडी कथालेखिका म्हणून त्यांनी कसदार कथांची निर्मिती केली आहे. ग्रामीण कथेच्या क्षेत्रात ज्यांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आणि तिच्या विकासात लक्षणीय हातभार लावला. मराठवाड्याच्या समर्थलेखिका म्हणून त्यांचेच नाव घ्यावे लागते. कारण त्यांच्या लेखनकाळात सामान्य ग्रामीण भागातील जीवनमानात बदल होऊ लागले. या बदलात काही मोडू लागले. तसे काही नवे येऊ लागले. यातूनच ताण निर्माण झाले. बदल आणि तणाव यांची एक अदृश्य साखळीच ग्रामीण मराठवाड्याच्या भागातून, हर एक कुटुंबातून ही प्रकटत होती. स्त्री पुरुष द्विधा मनस्थितीत जगत होता. कौटुंबिक जाणीवेला आणि नातेसंबंधाला तडे जात होते. याचे चित्रण त्यांच्या कथांमधून येते.

ललिताबाईच बालपण ग्रामीण भागात गेल्यामूळे आणि नोकरीही, अहमदपूर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्यामुळे त्या परिसराचा संपूर्णतः परिणाम त्यांच्या लेखनावर जाणवतो. लेखकांचे जे जीवनानुभव असतात त्याचेच चित्रण त्याच्या साहित्यातून येत असते. चित्रणाबद्दल माजी कुलगुरु डॉ नागनाथ कोतापल्ले म्हणतात,

" जीवनानुभव ज्या जीवनस्तरावरचा असतो, त्यास्तरांचा म्हणून काही गंध असतो. आणि तो साहित्यात उमटणे अपरिहार्य असते. ग्रामीण जीवनस्तरावरचे काही अनुभव प्रकट होत असल्यामुळे त्या अनुषंगाने अगदी सहजपणे त्या लेखनात ग्रामीण जीवन चित्रण येऊन जाते." ललिताबाईनी लिखाणाची सुरुवात जरी कवितेने केली असली तरी त्यांची ओळख कवयित्रीपेक्षा कथालेखिका म्हणून समीक्षकांनी त्यांच्या कथेचा आणि त्यांचाही सन्मान केला.

कथेविषयी विवेचन करतांना " मराठवाड्याची आजची कथा या लेखात डॉ. जयदेव डोळे लिहितात, "ललिता गादगे, छाया महाजन, तेजस्विनी जाधव याही चांगल लिहितात पण सातत्य अर्थातच कमी" डॉ. जयदेव डोळे यांचे हे मत १९९३ चे आहे. आज मात्र या लेखिकांनी मराठवाड्यातली कथाच नव्हे तर कादबरी, कविता ललित गदयाच दालन समृद्ध केलं आहे.

यानंतर ललिताबाईचा 'दुःख आणि अश्रू', 'प्राजक्ताची फूलं आणि दाह" हे कथासंग्रह तीन ललितगदय संग्रह, तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यामुळे त्यावेळी लिखाणात सातत्य कमी ह असलं तरी आज मात्र विपूल साहित्य आहे. कादंबरीलेखनाचा संकल्पही त्यांनी केला आहे. 'मराठवाड्यातील कथावाङ्मय' या लेखात जगदीश कदम म्हणतात, " ललिता गादगे यांची कथा पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीची होणारी कुचंबणा संयतपणे अधोरेखित करते." ललिताबाईच्या कथेमधून आक्रमक अशा स्त्रियांचे फारसे चित्रण येत नाही. वेदना, दुःख करतात. पण संयतपणे तस पाहता 1940 ते 1960 च्या दरम्यान र.वा. दिघे, द.र कवठेकर, व्यंकटेश माडगूळकर, विभावरी शिरूरकर, आणाभाऊ साठे यांच्या लिखाणातून बंडखोर व आक्रमक स्त्री पात्रे आली आहेत पण हया कथांनंतर 20-25 वर्षांनी जास्त काळ जाऊनही गादगेबाईची कथा कुठेही स्त्रीपात्रे भडक, आक्रमक दिसत नाहीत. उलट परिस्थिती हाताबाहेर गेली, अगतिक असहाय्य झालेली स्त्रीपात्रे आपणहून परिस्थितीशी न लढता माघार घेतात, जीवन संपवतात. सोडवणूक ग्रामीणकथेत लालिताबाईंचे नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. जगदीश कदम म्हणतात,

"मराठवाड्यात ग्रामीण कथालेखन करणाऱ्या लेखिका बोटावर मोजण्या इतक्याही नाहीत. ललिता गादगे आणि मधु सावंत ही दोनच नाव या क्षणी डोळ्यासमोर आहेत. लालिता गादगे

यांच्या कथांमधून मध्यमवर्गीय ग्रामीण जीवनाचे चित्रण बारकाव्यानिशी येते. गादगे यांचे 'आयुष्याच्या काठाकाठाने व. नाळबंधाची कहाणी वाचकांच्या पसंतीस उतरले आहेत" जगदीश कदम म्हणतातत्या प्रमाण पहिलाच कथासंग्रह 'श्रायुण्याच्या कामभागने' व 'नाळबंधाची कहाणी' वाचकांना भावले ललिता-बाईच्या काव्यालाही समीक्षक व साहित्यिक वाचकांकडून सन्मान प्राप्त इताला आहे. 75 नंतरची मराठवाड्यातील कविता आणि त्यातील वैविध्यपूर्ण जाणीवा या लेखात पृथ्वीराज तौर म्हणतात, "परंपरेकडून मिळालेली ही बधीरता कवयित्रीने ताकदीने शब्दांत पकडली आहे. ललिता गादगे यांचा कथेच्या प्रातांत लिलया वावर असतांना कवितेलाही तेवढयाच ताकदीने उभी करतात.

अनोखे भावविश्व चित्रित करणाऱ्या लालिताबाई म्हणतात "अस्सल अनुभव असल्याशिवाय मी लेखणी हाती धरीत नाही. त्यांच्या कथा वाचतांना त्या ज्या वातावरणात, समाजात वावरल्या, त्या समाज वास्तवाचा अतिशय प्रभावी असा आविष्कार त्यांनी केलेला आहे. त्यांच्या कथेतून मराठवाड्याच्या प्रादेशिक आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण, येथील परिसर, भाषा, बोली पात्रांची नावे ते सर्व त्या त्या त्या परिसरातीलच आहे. लेखिका ते जीवन स्वतः जगली आहे. याचा प्रत्यय कथा वाचतांना येतो, वाचकांला पात्रांच्या मनाचा ठाव घेता येतो, त्यांच्या दुःखाशी समरस होता येतं. मनामध्ये कारुण्य निर्माण होते. कथा संपल्यानंतर हळहळ वाटते. उदास होतं. हा सगळा प्रभाव त्या कथेचा असतो. त्यांच्या कथेविषयी गौरवोद्गार काढतांना' पानिपत 'कार विश्वास पाटील यांनी म्हटले आहे "चारुता सागर नंतर अस्सल कथा वाचण्याचा अनुभव घेऊन मनापासून आनंद वाटतो. गावाकडची आपली एक भगिनी चांगल्या दर्जेदार कथा लिहिते याचा अभिमान वाटतो. अशा प्रकारे बाईंच्या कथांची समीक्षकांनी नोंद घेतली आहे यातच त्याच्या कथांचे यश दडलेले दिसून येते.

लालिताबाईच्या कथातून चीड आहेच. हतबलता व निराशाही आहे. जीवनात हरघडी आणि सर्वदूर दिसणारे खिन्न रंगही आहेत. कोवळ्या मुलीच्या काव्यमय प्रेम प्रतिक्रियेचे झालेले शोषण (पाठलाग, चिमणीचे पिल्लू) गरीब असो वा श्रीमंत मातेचं वात्सल्य व अपमृत्युचं दुःख

इथून तिथून सारखचं. पण दारिद्रय व असंस्कृत साथ यामुळे लक्ष्मीला मीनलपेक्षा भोगावी लागणारी वेगळी व्यथा (आस) अपंग मुलाची आई म्हणून सोसावी लागणारी, सरस्वतीची जीवघेणी कुतरओट (कोळिष्टक) वैधव्यामुळे भोगावी लागणारी तरुण सुमाची मानसिक व सामाजिक उपेक्षा (गच्यमुठ) लग्नाच्या बाजारात उपेक्षित राहिलेल्या प्रौढ कुमारिकेची आयुष्याच्या काठाकाठाने 'जगतानाची कातरता आणि एकूणच स्त्रीच्या नशिबी येणारे व्यवस्थाजन्य, अटळ असे दुःख त्या रंगवतात. त्यांच्याही कथेतून बळी जाते ती स्त्रीच. परंतु हे मांडत असतांना त्यांची कथा व्यर्थ आक्रदनशील अशी होत नाही.

जीवनाच्या विशाल पटाच्या संदर्भात त्या कोण्या एका पक्षास दोष देताना दिसत नाहीत. या कथांमध्ये स्त्रीच्या वाट्याला येणारे उदास रंग आहेतच व या सर्व रंगछटा बहुधा पुरुषी शोषण क्रुरतेतूनच निर्माण होतात् तरीही त्यापलिकडे जाउन ललिता गादगे विश्लेषणातून उत्तर शोधताना दिसतात. पुरुषी व्यवस्थेला दोषी धरणे एका अर्थाने सोपे असते. पण त्याहीपलीकडे जाऊन चिंतनातून जीवनविषयक व्यवहारातील अगम्य उत्तर शोधण्याचा प्रयत्न हा अधिक महत्त्वाचा मानला पाहिजे (घर, रिक्त हस्त व एकाकी या कथा या दृष्टीने पाहण्याजोग्या आहेत) उत्तर मिळतेच असे नाही. ते मिळालेलेही नाही. तथापि उत्तरांचा शोध प्रश्नांना एक नवे प्रगल्भ परिमाण देते. या प्रगल्भतेच्या व पुरेशा चिंतनशिलतेच्या आश्वासक अशा उगवत्या पाऊलखुणा या कथांचा विशेष आहे. तृप्त सांसारिक कथेची कवचकुंडले टाकून स्त्रीची लेखणी प्रतिक्रियावादी बनू लागल्यानंतरचा पुढचा महत्त्वाच्चा चितंनशील टप्प्या त्यांच्या लेखणीत दिसतो: हे पुरेसे आश्वासन त्यांच्या कथांत आहे.

ललिता गादगे यांच्या कथेबद्दल प्रस्तावनेत भारत सासणे म्हणतात, " प्रा. ललिता गादगे यांच्या कथा प्रतिक्रियावादातून बाहेर पडल्या आहेत असे वाटते. त्यांच्या कथांतून आवश्यक तेवढे गांभीर्य तरी निदान दिसतेच आहे. त्याचबरोबर त्यांच्या कथा चिंतनशील होऊ लागतात. ग्रामीण कृषिविषयक समाजजीवनाची सुक्ष्म जाणीव त्यांच्या कंथातून दिसते. त्या अनुषंगाने त्यांच्या कथांत ग्रामीण बोलीभाषाही सहजपणे आलेली दिसते.

"... तितं निसता आरडा उठलाय.... भात येनलान्हाई नीटकडी निस्ती पानी झाल्याय.... चल चल, मायन लग्गी बोलिवलय लय करवादल्याय (धरित्री); येत जाए आनशा पोथीला. तेवडीच इसरांत जीवाला, किती रोज भिवावं लोकाइला. कारली आसराप हाय बग. बोलणाऱ्यानं बोलूनी येडं वाकडं.' (देह) 'माय वाट बगत आसंल कवा धरनं आज आनिक कुटली की तूर काडाया जाणार व्हती....' आदर्श भाकरीनं काय व्हयतर.... त्या टोपल्यात चार वटान्याच्या शेंगा हाईत.खा. उकडीन म्हून आनलया पर जरा बी बसावंच वाटंना. आन बिब्याची फुले बी हाईत बग... (शाल) अशी काही बोली भाषेची उदाहरण देता येतील. स्त्रीचा जाणारा अगतिक बळी, ती काही गादगे यांची ऐकमेव थीम नाही. त्यांची पात्र प्रतिकाराची क्षीणशी हाक देतात.

वासुदेव मुलाटे ललिताबाईच्या कथाविषयी म्हणतात, "केवळ स्त्री म्हणून वाट्याला आलेल्या स्त्री दुःखाच्या कथा ललिता यांनी चितारल्या आहेत. या कथांमधून ग्रामीण समाजजीवनाची सूक्ष्म जाणीव ही प्रकट होतांना दिसते. स्त्रीच्या मनातील दुःखमय परिसर दृश्यमान करीत असतांना त्या अनुषांगिक अशा ग्रामीण बोलीचाही वापर सहज करतात." याचा प्रत्यय वाचकाला कथा वाचतांना येतो. 'प्राजक्ताची फुलं आणि दाह' या कथासंग्रहातील कथांमध्ये जाणवली. स्त्रीच्या नजरेतील खोलवर दडलेल्या उदास स्तोगांचा जाहिरनामा 'स्त्री'च आभाळ आतून दबून गरजत असतं हे गर्जन साक्षात करणाऱ्या हया कथा."

फुलारींची प्रतिक्रियाही वाचकांना अंर्तमुख करते, जाहिर नामा हक्काचा असतो पण इथे तर स्त्रीच्या आयुष्यात खालेवर तिची दु:खे स्तोत्रासारखी आहेत. आभाळ गरजत,बरसत त्याचा उपयोग सृजनासाठी होतो. धरितिच्या तृप्तीसाठी, सजीवांना जीवदान मिळत पण इथे तर स्त्रीच्या गरजणं ही मातीमोल आहे. तिच्या दु:खाचं कारणही तिच आणि अश्रूच कारणही ती स्वत:च. स्त्रीयांच्या दु:खाचं आणि अश्रुच कारण मात्र पुरूष संस्कृती असूनही पुरूषच कारणीभूत आहे अस मात्र त्या मांडत नाहीत. स्त्रीची आदिम वेदना मांडतांना पुरुषच जबाबदार किंवा अपराधी आहे असं चित्रण कथेत कुठेठी नाही. मात्र हयाच समाजात जीवन जगतांना तिचा अंर्तपरिसर दुःखमय होली, असे दिसून येते. 'वर्तुळ' कथेत बी.ए. झालेल्या विभासाठी त्रस्त नाना,

पण लग्न जमल नाही. मग मुलगी सहानुगातीचा विषय बनते. 'आभाळ फाटलेलं' मध्ये वेडसर मतिमंद रूख्मीसाठी भीक मागून तिच पोट भरणारा म्हातारा आजा नातीसाठी धडपडतो पण शेवटी उत्तर मिळत नाही.

'अ लूक बीट हायर' मधील जिल्हाधिकारी यशोदा मनोहर' चे वडील आप्पा मूलीसाठी धडपडतात. पण त्यांची शेवटची जवाबदारी तिचं लग्न ले करून देउ शकत नाहीत, म्हणून त्रस्त. या अशा सर्वच कथांमधून येथील समाज, त्याने आखून दिलेल्या चौकटी आणि या चौकटीमध्ये स्वतःला बसवलेली पात्रे यातून काही मुलभूत समस्या निर्माण झाल्या आहेत हे दिसून येते.

या कथांमधून असे दिसते की स्वातंत्र्यांची सुवर्ण महोत्सवी वाटचाल संपूनही, येथील स्त्रीअजूनही सामाजिक पारतंत्र्यातील जीवन जगते आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाची, अस्तित्वाची तिल्या देहापलीकडे जाऊन स्वतंत्रपणे दखल घेतली जाते असे नाही. तिच्या वागण्या - बोलण्याचा, विचार करण्याचा जीवनविषयक चिंतनाचा फारसा विचार करतांना, तिला गंभीरपणे घेतांना अजूनही समाज दिसत नाही.

महानगरीय स्त्री संदर्भात थोडाफार पुरोगामी विचार दिसून येत असला तरी एकूणच स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची फारशी दखल घेतलेली दिसून येत नाही. आजही स्त्रियांचे प्रश्न सुटले आहेत बसे खंबीरपणे, ठामपणे म्हणता येत नाही. सर्व कथांमधून ललिताबाईनी छोटया छोटया प्रसंगातून निर्माण होणारे ताणतणाव रेखाटण्याचा स्त्रीवदनेचा हुंकार समाज मनापर्यंत पोहोचवण्याचा एक चांगला प्रयत्न केल्याचे दिसून येते.

नव्वदच्या दशकात सुरु झालेल ललिता गादगे यांच लिखाण पंचवीस वर्षात तीन कथासंग्रह, तीन काव्य संग्रह दोन ललितगदय इ. प्रकाशित झाले आहेत. तरीपण लेखिकेच्या लेखणीतून आणखी सकस लिखाणाची अपेसा वाचकांनी करणे गैर नाही. ललिताबाईच्या साहित्यनिर्मितीला वाचक, समीक्षक, दिग्गज साहित्यिकांच्या कौतुकाची थाप मिळाली तसेच पुरस्कारानीही त्याना सन्मानित केले आहे.

1992 चा राज्यस्तरीय पुरस्कार 'अग्निजल' काव्यसंग्रहाला 1994 चा राज्यस्तरीय पुरस्कार 'दु:ख आणि अश्रु' या कथासंग्रहाला तसेच 1995 मसाप औरंगाबादचाही पुरस्कार मिळाला. 'प्राजक्ताची फुलं आणि दाह, ला 2002 चा मसाप औरंगाबादचा पुरस्कार तसेच कोपरगावचा रोहमारे पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट ललित लेखनासाठीही नांदेडचा राज्य स्तरीय पुरस्कार 2009 ला धोंडीराम माने उत्कार वाङ्मय पुरस्कार मिळाला.

कथा, काव्य, ललित लेखनासाठी अनेक पुरस्कार मिळाले आणि फेब्रु 2014 ला मराठवाडा लेखिका साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष म्हणूनही बहुमान मिळाला. अशाप्रकारे कथाकार ललिता गादगे यांचा सन्मानही झाला.

संदर्भ:

1)ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध, डॉ. नागनाथ कोतापल्ले

2) प्रतिष्ठान त्रैमासिक, म.सा.प. औरंगाबाद

3)मराठवाड्यातीत्य साहित्य - जगदीश कदम

4) 'आयुष्याच्या काठाकाटाने' – ललिता गादगे

5) दु:ख आणि अश्रु' ललिता गादगे

6) प्राजब्ताची फुलं आणि दाह' - लालिता गादगे